# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.09.2024** **वार – शुक्रवार**

---

**रक्षा खडसे**

विकसित भारत योजनेमध्ये युवा पिढीचा मोठा सहभाग अपेक्षित आहे; सशक्त आणि सुरक्षित देशाच्या निर्मितीसाठी युवा पिढीचा हातभार लागावा, अशी अपेक्षा केंद्रीय क्रीडा राज्य मंत्री रक्षा खडसे यांनी आज पुण्यात व्यक्त केली. 'माय भारत'च्या माध्यमातून युवा पिढीने राजकारणाच्या क्षेत्रात चमकदार कामगिरी करावी; असंही त्यांनी सूचित केलं. विश्वकर्मा इन्स्ट्यिटूट ऑफ टेक्नॉलॉजी इथं 'विकसित भारत ॲम्बॅसेडर : युवा कनेक्ट' उपक्रमा अंतर्गत आयोजित विशेष कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**यशस्वी**

विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता; प्रत्यक्ष कामाच्या अनुभवातून मिळणारं ज्ञानही घ्यायला हवं असं प्रतिपादन सॅन्डविक कोरेमंट इंडिया कंपनीचे व्यवस्थापक हेमंत नाडगौडा यांनी आज पुण्यात केलं. यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या एमबीए आणि एमसीए विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम प्रारंभाच्या निमित्तानं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**कामगार**

महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी कामगारांनी नोंदणी करावी असं आवाहन कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी केलं. नोंदणी केलेल्या घरेलू कामगारांना गृहउपयोगी वस्तुसंच वाटप कार्यक्रमात ते आज चिंचवडमध्ये बोलत होते.

**सूर्यघर**

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत पुणे परिमंडल अंतर्गत आतापर्यंत घरगुती वीजग्राहकांचे 13 हजार 677 अर्ज मंजूर करण्यात आले आहेत, अशी माहिती मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी दिली आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेमध्ये पुणे परिमंडलात 13 पूर्णांक 73 मेगावॅट क्षमतेचे 2 हजार 748 सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत; या घरगुती वीजग्राहकांचं मासिक वीजबिल जवळ जवळ शून्यावर आलं आहे. त्यामुळे घरगुती ग्राहकांनी या योजनेत अधिकाधिक संख्येनं सहभागी व्हावं असं आवाहनही पवार यांनी केलं आहे.

**गणेशोत्सव**

गणेशोत्सवात पुणे शहरात थेट बाजारपेठांपर्यंतच्या सुखकर प्रवासासाठी पीएमपीला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला. प्रवासी संख्या वाढल्याने पीएमपीच्या उत्पन्नातही भरीव वाढ झाली आहे. यंदाच्या गणेशोत्सवात 1 कोटी 28

लाख 56 हजार प्रवाशांनी पीएमपी सेवेचा लाभ घेतला. त्यातून पीएमपीला साडेसतरा कोटी रुपयांचं उत्पन्न मिळालं आहे.

**पुरस्कार**

दिशा परिवार चारिटेबल ट्रस्ट संस्थेच्या वतीने दिला जाणारा 'दिशा परिवार सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार' योग प्रशिक्षक दीपक हिरवे आणि झोपडपट्टीतील महिलांना आरोग्यविषयक सल्ला, वैद्यकीय मदत मिळवून देणाऱ्या मनीषा गाडे यांना जाहीर झाला आहे. येत्या रविवारी पुण्यातील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवनात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. या सोहळ्यामध्ये बारावी उत्तीर्ण झालेल्या राज्यभरातील 250 गरजू - गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक अर्थसहाय्य प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती ट्रस्टचे प्रमुख राजाभाऊ चव्हाण यांनी दिली.

**अतिवृष्टी**

यावर्षी ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीचा फटका पुणे जिल्ह्यातील आठ तालुके आणि 117 गावांमधील शेतपिकं आणि फळपिकांना बसला होता. याबाबतचा नुकसान अहवाल नुकताच जाहीर झाला आहे. यानुसार बाजरी, भुईमूग, मूग, घेवडा, सोयाबीन या जिरायती पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. पुरंदर तालुक्यातील सीताफळांच्या बागांना देखील अतिवृष्टीचा फटका बसला आहे. नुकसान झालेल्या क्षेत्राचे पंचनामे केले असून संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल असं जिल्हा कृषी अधीक्षक संजय काचोळे यांनी सांगितलं.

**खेलो इंडिया**

अस्मिता खेलो इंडिया महिला लीग आणि मुलींच्या गटाची खो खो स्पर्धा येत्या 28 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर या कालावधीत गुजरातमध्ये होणार आहेत. यासाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर झाला आहे. पुण्याच्या कोमल डारवटकर हिच्याकडे महिला गटाचं कर्णधारपद सोपवण्यात आलं आहे.  याशिवाय रुतिका राठोड, प्रियंका इंगळे आणि पूर्वा वाघ या पुण्याच्या खेळाडूंनाही संघात स्थान देण्यात आलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 32 तर किमान तापमान 22 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही कमाल आणि किमान तापमान साधारण असंच राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**